International Year of Cooperatives 2025

महाराष्ट्र शासन

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.**

दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७ Email - commpat2018@gmail.com

जा.क्र.सआ-५/पत/नि.मं./MIS/Phase-२/२५-२६/2557/२०२६ दिनांक :- 08 ऑक्टोबर, २०२६

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

३) उपनिबंधक / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका / वॉर्ड (सर्व)

**विषय :- पतसंस्था MIS प्रणालीमध्ये सन २०२५-२०२६ (दि.३१/०३/२०२६ अखेर) ची माहिती भरणेबाबत.**

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत असून त्याचे अवलोकन करावे.

महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांनी राज्यातील सर्व नागरी / ग्रामीण बिगर कृषी / पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थांचे कामकाजाची माहिती एकत्रित करण्यासाठी 'मे.कल्प टेक्नॉलॉजीस् प्रा.लि., पुणे' या कंपनीमार्फत विकसित केलेल्या 'Management Information System' **हया ऑनलाईन प्रणालीमध्ये सन** २०२५-२०२६ (**दि.**३१/०३/२०२६ **अखेर**) **ची माहिती भरण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.**

**सन २०२४-२५ मध्ये नोंदणी केलेल्या पतसंस्थांनी सन २०२५-२६ साठी पुन्हा नोंदणी करु नये. संस्थेच्या पूर्वीच्या user id व password चा वापर** करुन MIS प्रणाली**मध्ये माहिती भरावी.**

**सदर प्रणालीमध्ये** दि.३१/०३/२०२६ **अखेरच्या** माहिती बरोबरच **खालीलप्रमाणे सुधारीत माहिती भरणे आवश्यक आहे.**

१. **संस्था प्रोफाइल** मध्ये **PAN** व **GST अपडेट** करावा.

२. **सर्वसाधारण माहिती मध्ये –**

i) **संस्थेचे दैनंदिन कामकाज संगणकीकृत प्रणालीद्वारे केले जाते किंवा नाही याबाबत माहिती – होय / नाही.**

ii) **संस्थेची** CBS **कार्यप्रणाली कार्यान्वित आहे किंवा नाही याबाबत माहिती – होय / नाही.**

iii) **संस्थेने प्रती ठेवीदार संभासदांसाठी** Unique Customer ID Code (UCIC) **ची पूर्तता केलेली आहे किंवा याबाबत माहिती – होय / नाही.**

३. **भांडवल माहिती मध्ये –**

i) **ठेवीचे प्रकार मध्ये मुदत, बचत, चालू खात्यातील ठेवीची माहिती भरावी.**

ii) **एकूण ठेवीदार संख्या व ठेव रक्कम यांची माहिती** जुळणे आवश्यक **आहे.**

४. **अंशदान माहितीमध्ये –**

- **मागील ३ वर्षांचा लेखापरिक्षक दाखला** (Audit Certificate) **अपलोड करणे.**

**पतसंस्थांनी भरलेली माहिती, संस्थेचे मुख्यालय ज्या तालुका किंवा जिल्हयामध्ये आहे, तेथील उपनिबंधक / सहाय्यक निबंधक, तालुका / वार्ड अधिकारी यांनी तपासणे** (validation) **आवश्यक आहे.** तसेच तपासून 'शेरा' नमूद करावा.

पतसंस्थेचे कार्यक्षेत्र काहीही असले तरी संस्थेचे मुख्यालय असलेल्या ठिकाणच्या उपनिबंधक / सहाय्यक निबंधक, तालुका / वार्ड अधिकारी यांची संस्थेकडून माहिती भरुन घेण्याची जबाबदारी आहे, जेणेकरुन १००% संस्थांची माहिती बिनचूक भरली जाईल याची दक्षता संबंधितांनी घ्यावी.

* Technical Support No.९०२१९००५७७ (श्री.सुभाष खवणे / श्री.रोहीत)

**(मिलिंद भालेराव)**

अपर निबंधक (पतसंस्था),

सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

PAT MIS - पत्रव्यवहार